**MHLA050001562022**

विशेष दिवाणी दावा क्रं. ४५/२०२२

**आदेश नि.क्रं. ३० वर**

प्रतिवादी क्र.१ हिचेविरूध्द झालेला एकतर्फा प्रकरण चालवण्याचा आदेश व प्रतिवादी क्र. २ ते ६ यांच्याविरूध्द त्यांच्या जबाबदाव्याविना दावा चालवण्याचा झालेला आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर वादीतर्फे म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध केला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींतर्फे युक्तिवाद असा की प्रतिवादी क्र.१ ही आजारी असल्याने न्यायालयात नेमल्या तारखेस हजर राहू शकली नाही. तसेच, प्रतिवादी क्र.२ ते ६ यांना महत्वाची व जुनी कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने जबाबदावा दाखल करू शकले नाही. त्यामुळे त्यांच्याविरूध्द आदेश पारित करण्यात आला. न्यायाच्या दृष्टीने तो आदेश रद्द करण्यात यावा. वादीच्या वकीलांचा युक्तिवाद असा की अर्जात संयुक्तिक कारण नसल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. सदरचे प्रकरण हे स्थावर मालमत्तेशी संबंधीत असल्याने पक्षाकारांचे हक्क व अधिकार ठरवण्यासाठी प्रतिवादी क्र.१ विरुध्द झालेला एकतर्फा प्रकरण चालवण्याचा आदेश रद्द करणे तसेच प्रतिवादी क्र.२ ते ६ यांच्याविरूध्द दावा विनाजबाबदावा चालवण्याचा आदेश रद्द केल्यास वादाचा पुर्णपणे निपटारा होण्यास मदत होणार आहे. यामध्ये वादीचे कांहीही नुकसान

होणार नाही. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परंतू सदरचा अर्ज मंजूर करतांना प्रतिवादींवर खर्च बसवणे न्यायोचित होणार आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**<u>आदेश</u>**

प्रतिवादी क्र.१ विरुध्द झालेला एकतर्फा प्रकरण चालवण्याचा आदेश व प्रतिवादी क्र.२ ते ६ यांच्याविरूध्द दावा विनाजबाबदावा चालवण्याचा आदेश वादीस रक्कमरू. ६००/– खर्च देण्याच्या अटीवर रद्द केला आहे व प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचा जबाबदावा स्वीकारण्यात आला आहे.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2023.07.11 16:29:54 +0530

(प्र. अ. सवदीकर)

दिनांक ११/०७/२०२३. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.